जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७७ दिनांक - २९/०१/२०२४**

पी.सी.बी.गुन्हे शाखा,पुणे शहर

## भारती विद्यापीठ पोलीस ठाणे परिसरात दहशत माजविणा-या,अट्टल गुन्हेगारावर मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांची एम.पी.डी.ए.कायद्यान्वये स्थानबध्दतेची कारवाई

पुणे पोलीस आयुक्तालयातील भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार नामे- **आदित्य उर्फ सोन्या खंडु कांबळे,वय २० वर्षे, रा. रुम नं.६, लेन नं. २, साईमंदीराजवळ हनुमाननगर जाभुंळवाडी रोड आंबेगाव खुर्द पुणे** हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे. त्याने साथीदारांसह भारती विद्यापीठ, येरवडा व विश्रांतवाडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत लोखंडी कोयता, तलवार या सारख्या जीवघेण्या घातक हत्यारांसह जबरी चोरी, पळवुन नेणे, बेकायदाशीर हत्यार बाळगणे यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. **मागील ५ वर्षामध्ये त्याचेविरूध्द ७ गंभीर गुन्हे दाखल आहेत.** त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परिसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती. तसेच त्याच्यापासून जीविताचे व मालमत्तेचे नुकसान होईल या भितीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

प्राप्त प्रस्ताव व सह कागदपत्रांची पडताळणी करुन **मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर श्री. रितेश कुमार, यांनी नमूद इसमाचे विरुध्द एम.पी.डी.ए. कायद्यान्वये चंद्रपुर मध्यवर्ती कारागृह, चंद्रपुर येथे १ वर्षाकरीता स्थानबध्दतेचे आदेश पारीत केले आहेत.** नमूद इसमास स्थानबध्द करण्यामध्ये श्री.दशरथ पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन पुणे व श्री.चंद्रकांत बेदरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पी.सी.बी. गुन्हे शाखा, पुणे शहर यांच्या आधिपत्याखाली पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी सदरची कामगिरी पार पाडली.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी कडक प्रतिबंधक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिले आहे. **त्यांनी दहशत निर्माण करणा-या व सक्रिय अट्टल गुन्हेगारांवर एम.पी.डी.ए.कायद्यान्वये स्थान बध्दतेच्या ९९ कारवाया केल्या आहेत.** यापुढेही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.